बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली क्र.020-25614495, 25614366,25514501 से 12 विस्तार 495

**प्रेस विज्ञप्ति**

०७-०९-२०२०

# बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे एमसीएलआर मध्ये १० बॅसीस पॉईंटने कपात

**पुणे दि. ७ सप्टेंबर २०२०** – देशात सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या मार्जिनल कॉस्ट ऑफ फंडस बेस्ड लेंडिंग रेट (एमसीएलआर) मध्ये सलग सहाव्या महिन्यात कपात केली आहे. निवडक मुदतीसाठी आताच्या दराच्या तुलनेत ही कपात १० बेसीस पॉईंटपर्यंत आहे व ती ७ सप्टेंबर २०२० पासून लागू होईल.

एक वर्ष आणि सहा महिने या मुदतींसाठी बँकेचा एमसीएलआर अनुक्रमे ७.३० टक्के (पूर्वी ७.४० टक्के) आणि ७.२५ टक्के (पूर्वी ७.३० टक्के) इतका असेल, जो सध्याच्या बाजारपेठेच्या परिस्थितीत स्पर्धात्मक आहे. इतर मुदती उदा. एक दिवस, एक महिना आणि ३ महिने यासाठी एमसीएलआर अनुक्रमे ६.८०%, ७.००% आणि ७.२०% असेल.

बँकेच्या एमसीएलआर मधील कपातीमुळे आर्थिक वृद्धी आणि औद्योगिक विकासाला चालना मिळेल.